## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

विषय- फेब्रुवारी-मार्च २०१७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत मुदतवाढ.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०१७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्यासाठी सुधारीत तारखा खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्कासह | शनिवार दि. ०१/१०/२०१६ ते सोमवार दि. २४/१०/२०१६ | मंगळवार दि. १८/१०/२०१६ ते शनिवार दि. २९/१०/२०१६ | शुक्रवार दि.०४/११/२०१६ - सोलापुर<br>शनिवार दि. ०५/११/२०१६ - अहमदनगर<br>सोमवार दि. ०७/११/२०१६ - पुणे |
| विलंब शुल्कासह | मंगळवार दि. २५/१०/२०१६ ते शनिवार दि. २९/१०/२०१६ | | |

* दिनांक १८/१०/२०१६ ते २९/१०/२०१६ या कालावधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंटींग करणे.

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन भरलेल्या (Upload केलेल्या) आवेदनपत्रांच्या याद्या वर दिलेल्या तारखांप्रमाणे तसेच प्रचलित पध्दतीप्रमाणे बँक ऑफ इंडियामध्ये चलनाद्वारे शुल्क भरून चलनाची प्रत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

२. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक १७/१०/२०१६

---

क.पुविमं./शाखा अ/परीक्षा/१३९९ पुणे.५ दि. १८.१०.२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालय
पुणे, अहमदनगर व सोलापुर.

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाबाबत आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) फेब्रुवारी/मार्च.२०१७ परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर करावयाच्या तारखा जा.क्र.पुविमं/शाखा अ/परीक्षा/१२७० दिनांक २९.०९.२०१६ च्या प्रकटनानुसार कळविण्यात आल्या होत्या तथापि उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनानुसार सदर तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर बाब संबंधित शिक्षकांच्या व विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी व उपरोक्त सुधारीत तारखांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

18.10

प्र. विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे.०५